# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**परिपत्रक क्रमांक : २९६२/ मराठी भाषा समिती (ड-१७)**

**विधान भवन, मुंबई.**

**दिनांक : २० फेब्रुवारी, २०२५.**

**संदर्भ :- मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक : मभादि -२०२४/प्र.क्र.१५१/भाषा-३, दिनांक ०६ जानेवारी,२०२५**

**:: परिपत्रक ::**

कविवर्य वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव म्हणून कविवर्य कुसुमाग्रज यांचा २७ फेब्रुवारी हा जन्मदिन "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरा करण्यात येतो.

मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, जतन व संवर्धन या मराठी भाषा विभागाच्या मुख्य धोरणास अनुसरुन **"मराठी भाषा गौरव दिन"** साजरा करण्यासाठी दरवर्षी विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना शासन परिपत्रकान्वये देण्यात येतात, त्यानुसार या वर्षी देखील मराठी भाषेसंदर्भातील विविध कार्यक्रम मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित करण्याबाबतच्या सूचना उपरोक्त परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. सदर परिपत्रक या सचिवालयाच्या **www.mls.org.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

त्यानुषंगाने महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या विद्यमाने गुरुवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी **"मराठी भाषा गौरव दिन"** हा कार्यक्रम कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० ते ४.०० या वेळेत साजरा करण्याचे योजिले आहे.

मराठी भाषा गौरव दिन या कार्यक्रमाची **"घेवू या एकच वसा मराठीला बनवू या ज्ञानभाषा"** ही संकल्पना मध्यवर्ती ठेवण्यात आली असून या सचिवालयातील अधिकारी /कर्मचारी यांच्या मार्फत कविवर्य वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या कविता, मराठी वाङ्मयीन साहित्याच्या अनुषंगाने कथाकथन, काव्यवाचन, ललितलेख, मराठी साहित्यासंबंधी पुस्तकांचे रसग्रहण, अभिवाचन व स्वरचित मराठी कविता यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

उक्त कार्यक्रमामध्ये या सचिवालयाच्या ग्रंथालय कक्षाकडून ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या वाचनीय व उत्कृष्ट मराठी ग्रंथसंपदेबाबतची माहिती देण्यात येईल. तसेच या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना वाचनाची प्रेरणा मिळण्यासाठी मार्गदर्शन देखिल करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या सादरीकरणामध्ये सहभागी होऊ इच्छिणारे या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांची नावे, पदनाम, सादरीकरणाचा प्रकार, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी माहितीचा तपशील मराठी भाषा समिती (ड-१७) कक्ष, कक्ष क्रमांक १२०४, १२ वा मजला, विधान भवन, मुंबई किंवा d17.mbs.mls@gmail.com या ई-मेल वर सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजी कार्यालयीन वेळेत पाठविण्यात यावा. सदर कार्यक्रमातील सादरीकरणामध्ये उत्कृष्ट व वाचनीय अशा साहित्याचा समावेश होणे आणि सादरीकरणाच्या विषयामध्ये वैविध्य राखण्यासाठी इच्छुकांकडून प्राप्त झालेल्या साहित्याबद्दलच्या माहितीची छाननी करण्यात येईल. कार्यक्रमांतर्गत सादरीकरणासाठी उचित साहित्य निश्चित झाल्यानंतर सादरकर्त्यास त्याचे सादरीकरण उपस्थितांसमोर करता येईल.

"मराठी भाषा गौरव दिन" साजरा करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असल्याने या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी आपला सहभाग नोंदवून कार्यक्रम यशस्वी करावा.

प्र. खोंदले

**( प्रकाशचंद्र खोंदले )**
**अवर सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

**प्रति:**

१. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
२. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
३. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४. सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५. सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी.
७. संगणक कक्ष (Website)
८. सुरक्षा विभाग,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
९. अग्निशमन विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.
१०. निवड नस्ती.